Vol II Issue V Nov 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidiciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 5, Nov. 2012
ISSN:-2231-5063
Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# " विदर्भ व मराठवाडा विभागातील क्रीडांगण राज्य शासनाचे योगदान "

प्रविण लामखाडे,

राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय कुही

**सारांश :**

जागतिक क्षेत्रामध्ये खेळ व क्रीडाचा विकास प्रचंड प्रमाणात होत आहे. त्याकरीता नविन तंत्र, नविन क्रीडांगणे, साहित्य व कुशल प्रशिक्षकांची व पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे. ''खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता '' 'fitness For All through sports' हा केंद्र बिंदू मानून महाराष्ट्र शासनाने 2001–2010 क्रीडा धोरण मंजूर करून क्रीडा क्षेत्रातील वेगवेगळया पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याकरीता आर्थिक तरतूद केली. सन 2002–2008 या कालावधीत विदर्भ मराठवाडा विभागात क्रीडांगण विकासावर शासनाने केलेली तरतूद व झालेला खर्च याचा तौलानिक अभ्यास प्रस्तुत संशोधनात सूचित केले आहे.

**प्रस्तावना :**

आज 21 शतकात मानवांनी प्रचंड प्रगती केली. हे स्पर्धेचे युग असून माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात होत असलेल्या क्रांतीकडे संपूर्ण जग एखाद्या लहान खेडयासारखे वाटत आहे. या यांत्रिक युगात माणूस आपले जास्तीत जास्त काम यंत्राने करतो आहे. त्याचा परिणाम त्याच्या आरोग्यावर दिसून येत आहे. या युगात उद्योगाच्या वाढीमुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला, प्रदुषण वाढले, मानवी जीवनाचा दर्जा घसरला, धावपळीच्या जीवनात स्वतःचे आरोग्य सांभाळणे कठीण झाले आहे. त्यामुळे मानवाला आपल्या आरोग्याचा व त्याला संबंधित असणाऱ्या सर्व मानवी वृत्ती–प्रवृत्तीचा समतोलपणा राहिला नाही. त्यामुळे अनेक मानसिक ताणतणाव, शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. 21 व्या शतकात शैक्षणिक आरोग्य, अण्वस्त्राचा हल्ला व प्रदुशण इत्यादी आव्हानांना आपल्याला सामोरे जावयाचे आहे. याकरिता मानवा जवळ चांगले स्वास्थ, मानसिक धैर्य, हिम्मत आणि तर्क संगत विचारसरणी असणे आवश्यक आहे.

" Health is a state of complete physical , Mental and Social Well being and not meraly the absence of disease of intirmity " या विश्व स्वास्थ संघटनाद्वारे (W.H.O.) स्वास्थ्याच्या व्याख्येप्रमाणे राज्यातील आबालवृद्ध नागरिकांमध्ये खेळाद्वारे शारीरिक सुदृढता आणि आरोग्य संपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्त्व बिंबवणे. उदयोन्मुख व प्रतिभावान खेळाडू घडविणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करणे ''सर्वांसाठी खेळाद्वारे सुदृढता'' (Fitness for all through sports) हा केंद्रबिंदू ठरवून महाराष्ट्र शासनाने सन 1996 ते 2000 सर्व प्रथम क्रीडा धोरण जाहीर केले. सदर धोरणाची फलश्रुती लक्षात घेवून शारीरिक शिक्षण, क्रीडा आणि युवक सेवा या बाबींचा विचार करून नविन योजनांची व कार्यक्रमांची तरतूद असलेले शासनाने 2001–2010 असे क्रीडा धोरण जाहीर केले. या क्रीडा धोरणातील क्रीडांगण विकास कार्यक्रमांतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागावर शासनाने केलेली आर्थिक तरतूद व प्रत्यक्ष खर्च याचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी क्रीडांगण विकास विशय संशोधन कार्यासाठी निवडला आहे.

**संशोधन विषय : क्रीडांगण विकास योजना**

राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंना त्यांचे क्रीडा कौशल्य, क्रीडागुण विकसित करण्यासाठी सुयोग्य क्रीडांगणाची मुलभूत सुविधा राज्यात मोठया प्रमाणात उपलब्ध करण्याच्या दृष्टीने व क्रीडाविशयक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याकरीता शासनाने शासन निर्णय 26/3/2003 अन्वये क्रीडांगण विकास योजना सुरू केली.

राज्यातील माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालये तसेच विविध खेळांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या पंजीबद्ध संस्था, क्रीडामंडळे, युवकमंडळे, महिलामंडळे याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा आणि आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांना क्रीडांगण समपातळीत आणणे, क्रीडांगणावर 200 मीटर अथवा 400 मीटर धावनमार्ग तयार करणे, क्रीडांगणावर कुंपण घालणे, विविध खेळांची क्रीडांगणे तयार करणे, प्रसाधनगृह बांधणे, पाण्याची सुविधा निर्माण करणे व भांडारगृहे उभारणे यासाठी अनुदान दिले जाते.

वर उल्लेखित प्रत्येक बाबींकरीता खर्च्याच्या 50 टक्के जास्तीत जास्त 2 लाख यापैकी कमी असेल इतके अनुदान दोन हप्त्यात देण्यात येते. सदर अनुदानित संस्थेद्वारा अनुदानाइतकी रक्कम खर्च करण्याचे अटीसह दिले जाते. आदिवासी भागातील खाजगी संस्थांना खर्च्याच्या 90 टक्के किंवा जास्तीत जास्त रूपये दोन लाख यापैकी कमी असेल इतके अनुदान दोन हप्त्यात देण्यात येते. त्याचप्रमाणे आदिवासी विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या शासकीय आश्रमशाळांना 100 टक्के अनुदान परंतू कमाल रूपये दोन लाख इतके अनुदान दिले जाते.

*अभ्यास क्षेत्र राज्यातील विदर्भ व मराठवाडा विभाग :*

क्रीडा धोरण ठरवितांना समाजातील सर्व स्तरांचा व राज्यातील महसूल विभागाचा विचार करून निधीचे वाटप करण्यात आले. क्रीडा म्हटले म्हणजे क्रीडांगण आलेच. सन 2001—2010 च्या क्रीडा धोरणात विदर्भ (नागपूर व अमरावती) व मराठवाडा विभागात क्रीडांगण विकासावर केलेली तरतूद व झालेला खर्च, तौलनिक दृष्टया अभ्यासांती खालीलप्रमाणे वर्गवार सांख्यिकीय विश्लेषण व विवेचन करता येईल.

सन 2002—2008 आर्थिक वर्षात राज्य शासनाने क्रीडांगण विकासावर केलेली तरतूद व झालेल्या खर्चाचा तौलनिक अभ्यास :

*सर्वसाधारण वर्ग :*

शासनाच्या क्रीडाधोरणानुसार क्रीडांगण विकास योजनेच्या अंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागातील सर्वसाधारण वर्गासाठी वर्ष 2002—2008 पर्यंत केलेली आर्थिक तरतूद व खर्च.

| | विदर्भ | मराठवाडा |
|---|---|---|
| तरतूद | 259.56 | 174.15 |
| प्रत्यक्ष खर्च | 256.47 | 174.15 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर | 98.81 % | 100 % |

विदर्भ विभागाकरीता 259.56 लक्ष रू. व मराठवाडा विभागाकरीता 174.15 लक्ष रू. इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार विदर्भ विभागात 256.47 लक्ष रू. व मराठवाडा विभागात 174.15 लक्ष रू. एवढा प्रत्यक्ष खर्च झाला. यावरून स्पष्ट होते की, विदर्भ विभागाकरीता केलेल्या तरतूदीपैकी 98.81 निधीचा वापर करण्यात आला तर मराठवाडा विभागात तरतूद निधीचा 100 : वापर करण्यात आला.

विदर्भ तसेच मराठवाडा विभागात महाराष्ट्र शासनाने क्रीडा धोरण अंतर्गत सर्वसाधारण वर्गाकरीता क्रीडांगण विकास योजनेवर केलेली तरतूद व झालेल्या खर्चाचा तुलनात्मक विचार केला तर असे दिसून येते की, मराठवाडा विभागापेक्षा विदर्भ विभागावर 85.41 लक्ष रू. तरतूद व प्रत्यक्ष खर्च 82.32 रूपयाने जास्त आहे.

*अनुसूचित जाती वर्ग :*

शासनाच्या क्रीडाधोरणानुसार क्रीडांगण विकास योजनेच्या अंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागातील अनुसूचित वर्गासाठी आर्थिक वर्ष 2002—2008 पर्यंत केलेली आर्थिक तरतूद व खर्च :

| | विदर्भ | मराठवाडा |
|---|---|---|
| तरतूद | 173.15 | 105.35 |
| प्रत्यक्ष खर्च | 173.15 | 105.35 |
| तरतूद केलेल्या निधीचा वापर % | 100 % | 100 % |

अनुसूचित जाती वर्ग क्रीडांगण विकास योजनेच्या अंतर्गत वर्ष 2002—2008 पर्यंत विदर्भ विभागासाठी 173.15 लक्ष रू. व मराठवाडा विभागासाठी 105.35 लक्ष रू. तरतूद करण्यात आली व दोन्ही विभागात संपूर्ण तरतूद केलेल्या आर्थिक सहाय्यांचा व्यय झाल्याचे दिसून येते.

उपरोक्त योजनेसंबंधी तरतूद केलेल्या निधीचा प्रत्यक्ष खर्चात पूर्णपणे व्यय झाल्याचे दोन्ही विभागात आढळून येते. दोन्ही विभागात तरतूद व प्रत्यक्ष खर्च हयामध्ये तफावत नाही.

*आदिवासी वर्ग :*

शासनाच्या क्रीडाधोरणानुसार क्रीडांगण विकास योजनेच्या अंतर्गत विदर्भ व मराठवाडयातील फक्त ( नांदेड जिल्हा ) आदिवासी वर्गाकरीता आर्थिक वर्ष 2002 ते 2008 पर्यंत केलेली आर्थिक तरतूद व खर्च :

| | विदर्भ | मराठवाडा (नांदेड जिल्हा) |
|---|---|---|
| तरतूद | 237.92 | 6.36 |
| प्रत्यक्ष खर्च | 237.54 | 6.36 |
| त्रतूद केलेल्या निधीचा वापर % | 99.84 % | 100 % |

उपरोक्त तालिकेवरून स्पष्ट होते की, विदर्भ विभागासाठी आदिवासी वर्गाच्या क्रीडांगण विकासाकरीता 237.92 लक्ष रू. व मराठवाडा विभागात (नांदेड जिल्हयाकरीता) 6.36 लक्ष रू. इतकी तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार विदर्भ विभागात 237.54 लक्ष रू. व मराठवाडा विभागात (नांदेड जिल्हा) 6.36 लक्ष रू. प्रत्यक्ष खर्च झाला. एकूण तरतूद केलेल्या निधीपैकी विदर्भ विभागात 99.84: निधीचा वापर करण्यात आला तर मराठवाडा विभागात 100: निधीचा वापर करण्यात आला.

विदर्भ व मराठवाडा (नांदेड जिल्हा) विभागात महाराष्ट्र शासनाने क्रीडा धोरणा अंतर्गत आदिवासी वर्ग क्रीडांगण विकास योजनेवर केलेली तरतूद व झालेल्या खर्चाचा तुलनात्मक विचार केला तर असे दिसून येते की, विदर्भ विभागात तरतूद तथा प्रत्यक्ष खर्च मराठवाडा विभागापेक्षा अधिक आहे. कारण विदर्भ विभागातील जिल्हयात डोंगराळ व जंगलीभाग जास्त आहे. त्यामुळे आदिवासी व भटक्या जमातीची संख्या जास्त आहे. जिल्हयातील आदिवासी वर्गाची संख्या लक्षात घेऊन विदर्भ विभागात उपरोक्त योजने अंतर्गत निधीची तरतूद करण्यात आली. मराठवाडयात फक्त नांदेड जिल्हयातच आदिवासी वर्गाकरीता 6.36 लक्ष रूपयाची तरतूद करण्यात आली. तुलनात्मकदृष्टया मराठवाडयातील नांदेड जिल्हयाकरीता केलेली तरतूद नागपूर विभागातील जिल्हयापेक्षा कमी दिसून येते.

### *निष्कर्ष व सूचना :*

1)राज्यातील महसूल विभागावर तरतूद व खर्चाचा तौलनिक अभ्यास केल्यास असे दिसून येते की, समन्याय तत्वाने निधीचे वाटप होत नाही.
2)विदर्भ व मराठवाडा विभागापेक्षा राज्यातील इतर विभागात निधीची तरतूद व खर्च जास्त दिसून येतो.
3)राज्याच्या महसूल विभागात विकासाचा असमतोल आढळून येतो.
4)क्रीडाधोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता क्रीडा विभागाकरिता राज्याच्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद केली जात नाही.
5)अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीप्रमाणे वेळेवर निधी उपलब्ध होत नाही.
6)राजकीय हस्तक्षेपामुळे निधी एका विभागातून दुसऱ्या विभागात वळता केल्या जातो. त्यामुळे नियोजित काम पूर्ण होत नाहीत असे दिसून येते.
7)गाव तेथे क्रीडांगण योजनेत लावलेल्या लोकसंख्येच्या निकष्यामुळे ग्रामीण भागातील 5 हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेली गावे व आदिवासी किंवा डोंगराळ भागातील 2 हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या खेडयात ही योजना पोहचली नाही. राज्यात अशा गावाची व खेडयाची संख्या जास्त आहे.
8)विदर्भ व मराठवाडा राज्यात आर्थिक दृष्टया मागासलेला भाग आहे. या विभागातील शैक्षणिक संस्थांची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे क्रीडांगण विकास योजनेत खर्चाच्या 50 टक्के संस्थेचा हिस्सा देण्यास असमर्थता दिसून येते. त्यामुळे शैक्षणिक संस्थेच्या क्रीडांगण विकासात खिळ बसलेली दिसून येते.
9)ग्रामीण विभागात शैक्षणिक संस्थेजवळ क्रीडांगणा करीता जागा उपलब्ध आहे पण विकासाकरीता पैसा नाही व शहरात शैक्षणिक संस्थेजवळ क्रीडांगणा करिता जागा नाही पण पैसा आहे असे दिसून येते.
10)शहरातील व ग्रामीण भागातील सार्वजनिक उपयोगाच्या जागेवर झालेली अतिक्रमण काढून परिसर शाळा समूहाला क्रीडांगण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
11)खेडयातील गावठाण्याच्या जागेचा उपयोग उघडयावरचे संडास, मैला, कचरा टाकण्याकरीता केलेला दिसून येतो. यावर बंदी आणून ही जागा क्रीडांगणा करीता उपलब्ध करून दयावी.
12)शासनाने टाऊन प्लॅनींग मध्ये सोडलेल्या मैदान व्यवस्थित नसल्यामुळे व देखभालीची व्यवस्था नसल्यामुळे झोपडपट्टी वसल्या जाते व जागेचा दुरुपयोग होत असलेला दिसून येतो.?
13)केंद्र सरकार व राज्य सरकारच्या करप्रणालीत शिक्षण कर आहे पण क्रीडा कर नाही. प्रत्येक व्यक्तीमागे क्रीडाकर लावल्यास होणाऱ्या उत्पन्नापासून क्रीडा मैदानाचा विकास व काही प्रमाणात खेळ साहित्यावर खर्च करता येईल.
14)समाजातील व्यक्तींनी क्रीडाकर दिला म्हणजे त्यांच्यात क्रीडा संस्कृती जागृत होईल व क्रीडा मैदान हे व्यायाम करण्यासाठी आहे, फिरण्यासाठी आहे अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होईल व समाजाच्या सहभागातून क्रीडा संस्कृतीचा विकास होईल.
15)क्रीडांगण विकास योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाकरीता लावलेले जाचक नियम शिथिल करण्याची आवश्यकता आहे.
16)क्रीडा धोरणाअंतर्गत क्रीडांगणाचा काही प्रमाणात विकास झाला असला तरी वेतनेत्तर अनुदान बंद झाल्यामुळे विकसित क्रीडा मैदानाची देखभाल झाली नाही व क्रीडा मैदाने पूर्ववत झालेली दिसून येतात.
17)शालेय स्तरावर शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षणाकरीता वेगळया अनुदानाची तरतूद करणे आवश्यक आहे व 250 विद्यार्थ्यांमधून 1 क्रीडा शिक्षकाची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

शिक्षण व शारीरिक शिक्षण एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत हे आपण मान्य केले आहे. म्हणून शिक्षणाप्रमाणे क्रीडा शिक्षणावर समन्याय तत्वाप्रमाणे निधी उपलब्ध करून दिल्यास क्रीडा संस्कृतीचा विकास होवून चांगले नैपुण्य प्राप्त करणारे खेळाडू निर्माण होतील. खेळाडूंची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी हा देशाचा, त्या राज्याचा एक प्रकारे गौरवच असतो. अशा खेळाडूंमुळेच त्या देशाला, राज्याला ओळखले जाते. म्हणूनच खेळाडूंच्या आवश्यक गरजा सोयी–सुविधा पूर्ण करणे हे शासनाचे तसेच समाजाचे कर्तव्य आहे.

### *संदर्भ :*

1)उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा विदर्भ विभाग व मराठवाडा सन 2002–2008 जिल्हा निहाय योजना त्याकरीता कमी/अधिक खर्च व अंमलबजावणी.
2)मंत्रालय, महाराष्ट्र शासन सन 2002–2008 महाराष्ट्र राज्याचे कार्यक्रम, अंदाजपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासकीय मुद्रणालय, पुणे.
3) महाराष्ट्र शासन क्रीडा धोरण 1996–2000 आणि 2001–2010.
4)क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य विविध योजना मार्गदर्शिका.
5)डॉ.म.भा.चराटे – समाजावर क्रीडा कर आकारणीचे टिकात्मक विश्लेषण. डि.लीट. साठी नागपूर विद्यापीठाला सादर – 2005.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium   Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net